पुण्य नगरी

गुरुवार, १ ऑगस्ट २०२४

# विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धन चळवळ हाती घ्यावी

## सिने अभिनेते सयाजी शिंदे : 'विवेकानंद'मध्ये एमबीए-एमसीए विद्याशाखेचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या लाखो विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनाची चळवळ हाती घ्यावी. झाड, फूल, फळ, पान यामध्ये मला माझी आई दिसते. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा विद्यार्थी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. स्वामी विवेकानंदांचे विचार आणि शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची शिकवण विद्यार्थ्यांनी अवलंबावी, असे प्रतिपादन अभिनेते सयाजी शिंदे यांनी केले.



विवेकानंद कॉलेजमधील नवीन विद्याशाखा एम. बी. ए. आणि एम. सी. ए. च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. स्वागत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. पाहुण्यांची ओळख सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी करून दिली. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराकटे, प्रा. अशोक पाटील यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग, पिळवणुकीस आळा, श्रम आणि स्वावलंबन या गोष्टी विद्यार्थ्यांमध्ये रुजाव्यात, यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले, असे प्रतिपादन केले. याप्रसंगी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी मत मांडले. यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगीताई गावडे यांच्या वाढदिवसानिमित्त मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी विद्यार्थी ऋषी डोंगरे आणि प्रा. सतीश उपळावीकर यांनी रेखाटलेली रेखाचित्रे सयाजी शिंदे यांना भेट म्हणून दिली. यावेळी प्राचार्य वीरेन भिर्डी, आर. के. पाटील, विराज जाधव, अमित आव्हाड, विजय पुजारी, अश्विनी चौगुले, सर्जेराव खोत यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आभार एम.बी.ए. चे विभागप्रमुख प्रा. विराज जाधव यांनी मानले. कार्यक्रमास कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. महेश गायकवाड उपस्थित होते.